04:59:53 PM

नि.फौ.खटला क्र.११५/२०
सरकार / शुभम चव्हाण
निशाणी क्र.२०

साक्षीदार क्र.१ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | – रणधीर शंकर देवकर |
| वडीलांचे नाव | – शंकर रामा देवकर |
| वय | – ३० वर्षे |
| व्यवसाय | – मजुरी |
| राहणार | – आटपाडी, ता. आटपाडी जि. सांगली. |

**सरतपास सहा. सरकारी वकील श्रीमती ए.पी.केसकर यांचेमार्फत शपथेवर सुरु**

१. माझ्या घरी मी, आईवडील, पत्नी असे असतो. मी गवंडीकाम करतो. सागर सुभाष चव्हाण हा माझा भाचा आहे. तो आटपाडी येथे असतो. सोमनाथ गायकवाड हा माझा मावस भाऊ आहे. घटना ही लॉकडाऊनमध्ये घडली होती. घटना घडून अंदाजे ३–४ वर्ष झाली. त्यावेळी भावकीत लग्नाचे कार्य होते. तिथे आम्ही सर्वजण गेलो होतो. तिथे आरोपीने माझ्या भाच्याला व मावस भावाला शिवीगाळ केली. मावस भावाने मला फोन केला की, असं असं झालंय व चौकातील बालाजी मंदीर येथे ये असे सांगितले. मी तिथे गेलो असता मला आरोपी क्र.१ ने शिवीगाळ केली. मी म्हणालो त्याला की, तुझ्या पप्पाकडे चल. त्याचे पप्पा मला म्हणाले की, तू लय शहाणा आहेस, तुला काय करायचे आहे. त्यावेळेस तीनही आरोपींनी मला मारले. आरोपी क्र.१ ने माझ्या डोक्यावर दांडक्याने मारले. मला टाके पडले आहेत. मला कमरेत दांडक्याने आरोपी क्र.२ ने मारले व हातापायाने लाथाबुक्या घातल्या. आरोपी क्र.३ ने माझ्या पाठीत हाताने व पायाने मारले. मला चक्कर आल्यामुळे मी बेशुध्द पडलो. त्यानंतर मला थोड्या वेळाने जाग आली तेव्हा

मी पोलीस स्टेशनला गेलो. तिथून मला त्यांनी दवाखान्यात पाठवले. दवाखान्यात मला सांगली येथे जाण्यास सांगितले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला येवून वर्दी दिली. आता मला दाखविण्यात आलेली वर्दी तिच असून त्यातील मजूकर खरा व बरोबर आहे. वर्दीस **निशाणी क्र.PW1-21** देण्यात येते. त्या संध्याकाळी मी सांगलीला गेलो. सांगलीतील डॉक्टरांनी माझ्यावर औषधोपचार केले व डोक्याला थोडे क्रॅक गेले आहे असे सांगितले. त्यानंतर मी वर्दी दिली. आता मला दाखविण्यात आलेली काठ्या त्याच असून त्याने मला मारहाण करण्यात आली होती. सदर काठ्याना **आर्टीकल MO-1 to 3** देण्यात येते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपींपैकी आरोपी क्र.१ आजरोजी न्यायालयात हजर आहे.

## उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.व्ही.पाठक यांचेमार्फत सुरु

२. माझे शिक्षण नववी पर्यंत झाले आहे. माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे 'मी म्हणालो त्याला की, तुझ्या पप्पाकडे चल' असे मी पोलीसांना सांगितले होते. परंतु तसा मजकूर माझ्या पोलीसांसमोरील जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगितले नसेल किंवा पोलीसांनी लिहून घेतले नसेल. माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे 'पप्पा मला म्हणाले की, तू लय शहाणा आहेस' असा मजकूर मी पोलीसांना जबाब देताना सांगितला नव्हता. मला आटपाडी येथील दवाखान्यात टाके घातले. माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे 'मला टाके पडले आहेत' असा मजकूर मी पोलीसांना जबाब देताना सांगितला होता. परंतु तसा मजकूर माझ्या पोलीसांसमोरील जबाबात का नमूद नाही याचे कारण सांगता येणार नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, लॉकडाऊनमध्ये लोकांनी घरातून बाहेर पडू नसे असे शासनाने सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, सरकारच्या आदेशाप्रमाणे लोकं घराबाहेर पडत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे लॉकडाऊनमध्ये

आम्हीही घराबाहेर पडत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, लग्नंसुध्दा तहसिलदार यांच्या परवानगीशिवाय करु नये असा आदेश होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला पुन्हा जबाबाला बोलवले नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, बालाजी मंदीर हे आटपाडी मुख्य रस्त्याला असणारे मंदीर आहे. हे म्हणणे खरे आहे की, बालाजी मंदीराच्या आसपास घरे व लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, लॉकडाऊनमध्ये मी बालाजी मंदीराच्या पाठीमागे रहायला होतो. हे म्हणणे खरे आहे की, सोमनाथ, सागरबद्दल घडलेली घटना मी प्रत्यक्षात पाहिली नाही त्यांनी सांगितले म्हणून मला माहिती झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराशेजारी लखन चव्हाण याचे घर आहे. पप्पू चव्हाण याचे घर माझ्या शेजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, पश्चिमेला मनोज चव्हाण याचे घर आहे. मनोज चव्हाणच्या घरी शेळ्यामेंढ्या जनावरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शेळ्या मेंढ्यांना हाकायला आर्टीकल MO–1 to 3 सारख्या काठ्यांचा वापर होतो. हे म्हणणे खरे आहे की, शुभम व शुभमचे आईवडील श्रीराम कॉलेजच्या पाठीमागे रहायला आहेत. बालाजी मंदीर ते शुभमचे घर अंतर ५०० मीटर असेल. हे म्हणणे खरे आहे की, शुभमच्या घराशेजारी देखील लोकांची राहती घरे आहेत.

५. हे म्हणणे खरे आहे की, मी दत्तापंच पाटील यांच्या गटाचे काम करतो. शुभम हा अनिल पाटील गटाचे काम करतो किंवा कसे याची मला माहिती नाही.

६. मी आटपाडी दवाखान्यात दुपारी १.३०–२ च्या आसपास दवाखान्यात पोहोचलो. मी तासाच्या आसपास दवाखान्यात थांबलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, तिथे दवाखान्यामध्ये मी डॉक्टरांना घटना काय झाली मला कसे मारले याची माहिती दिली. हे म्हणणे खरे नाही की, मला रक्ताची जखम झाली नव्हती. रक्त पडलेला शर्ट मी पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्याकडील काठ्या पोलीसांना काढून दिल्या. मी पोलीस स्टेशनला परत ३.३०

च्या आसपास पोहोचलो. पोलीस स्टेशनला मी अर्धा पाऊण तास थांबलो होतो.

७. हे म्हणणे खरे आहे की, शुभमचे वडील पायाने अधू असल्यामुळे लंगडत लंगडत चालतात. रोहीत हा सिमेंटची गाडी खाली करण्यासाठी हमाली करायला असतो किंवा कसे याची मला माहिती नाही. विशाल काय करतो याची मला माहिती नाही. शुभम काय करतो याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, शुभम मजुरी करतो. हे म्हणणे खरे नाही की, शुभम अनिल पाटीलचे काम करतो याचा माझ्या डोक्यात राग होता. हे म्हणणे खरे आहे की, मी दुसरे लग्न केल्याची केस माझ्या विरुध्द न्यायालयात चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः लॉकडाऊनचा भंग करुन गाडीवरुन चाललो होतो व गाडी स्लीप होवून खाली पडल्यामुळे मला जखम झाली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली असे मी खोटे सांगत आहे. डोक्याला क्रॅक गेल्याचा रिपोर्ट मी पोलीसांना दिला नाही. पोलीस देखील परत माझ्याकडे या केससंदर्भात आले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे मी पडून झालेल्या जखमेचा गैरफायदा घेवून मी आरोपींविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात आरोपींच्या हिताविरुध्द सांगितलेला सर्व मजकूर खोटा आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Sd/-xx

(वि. द. पाटील)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

आटपाडी.

दिनांक : १४/१२/२०२३

05:36:49 PM

*****